**B.KUMAR'S ACADEMY**

## Unit Test - 1

| | | |
|---|---|---|
| **विषय** : मराठी | **२. संतवाणी, ३. शाल, ४. उपास,** | **एकूण गुण :** ३० |
| **इयत्ता** : १० वी | **५. मोठे होत असलेल्या मुलांनो (स्थूलवाचन)** | **वेळ :** १ तास |

**प्र.१ला : खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.**

अग्निमाजि पडे बाळू ।
माता धांवें कनवाळू ॥१॥
तैसा धांवें माझिया काजा ।
अंकिला मी दास तुझा ॥२॥
सर्वेचि झेंपावें पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणीं ॥३॥
भुकेलें वत्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ॥४॥
वणवा लागलासे वनीं ।
पाडस चिंतीत हरणी ॥५॥
नामा म्हणे मेघा जैसा ।
विनविती चातक तैसा ॥६॥

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **२**

i) बाळाला वाचवण्यासाठी कोण धावून येते?

ii) चातक पक्षी कोणाची विनवणी करतो?

**२. उत्तरे लिहा :** **१**

i) पाडसासाठी चिंतित असणारी - ☐

ii) संत नामदेव कोणाचे दास - ☐

**३. खालील काव्यपंक्तीतील आशय सौंदर्य स्पष्ट करा.** **२**

i) 'अग्निमाजि पडे बाळू । माता धांवें कनवाळू ॥
तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ॥'

**४. खालील काव्यपंक्तीचे रसग्रहण करा** **२**

i) वणवा लागला वनीं । पाडस चिंतीत हरणी ।
नामा म्हणे मेघा जैसा । विनविती चातक तैसा ॥

**प्र.२रा पुढील उताऱ्याच्या आधारे विचारलेल्या कृती सोडवा.**

मी २००४ साली मराठी साहित्य संमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो. तत्कालीन एक-दोन वर्षांत माझ्यावर शालींचा वर्षाव झाला. एवढ्या शाली जमत गेल्या, की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणे शक्य नव्हते. मग मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले व त्या शाली वापरण्याचे वगैरे त्याला सर्वाधिकार दिले. बिचारा अतिप्रामाणिक ! त्याच्याही छोट्या खोलीत त्याने ते सांभाळले.

हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या, गरीब श्रमिकांना !

याच सुमारास मी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बहुधा रोज संध्याकाळी जात

असे. तेथील कट्ट्यावर बसणे मला आवडे. एक दिवस काय घडले, की कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले. दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराच्या कट्ट्यावर आलो. तो म्हातारा होताच. त्याला दोन्ही शाली दिल्या. त्याने थरथरत्या हातांनी नमस्कार केला.

**१. एका शब्दात उत्तरे लिहा.** १

i) लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले ते साल.

ii) लेखकाची खोली

**२. चौकटी पूर्ण करा.** १

i) लेखकाने म्हाताऱ्याला शाली दिल्या - [ ]

ii) निकटवर्ती मित्राचा स्वभाव - [ ]

**३. खालील गोष्टींचा झालेला परिणाम लिहा.** १

i) तत्कालीन एक-दोन वर्षात लेखकावर शालींचा वर्षाव झाला.

**४. (स्वमत)** ३

i) भिक्षेकऱ्याने केलेल्या शालींचा उपयोग याविषयी तुमचे मत लिहा.

**५. सहसंबंध लिहा .** १

i) निकटवर्ती : मित्र :: गरीब : .................

ii) शालीचे : गाठोडे :: आठ बाय सहा ...................

**प्र.३रा पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

"अरे पंत, खाण्याचा आणि वजनाचा काय संबंध?" भिकोबा मुसळे म्हणाला, "मी बघ एकवीस गुलाबजाम खाल्ले एवढंच काय, आपण तर आयुष्यात एक्सरसाईज नाही केला. तुझी कुंभ रास नि कुंभ लग्न आहे. नुसता वायू भक्षण करून राहिलास तरी तू असाच जाड्या राहणार. लठ्ठपणा काय आपल्या हातात आहे?"

"नॉन्सेन्स!" जगदाळे ओरडला, "रनिंग कर रोज."


"रनिंगपेक्षा देखील दोरीवरच्या उड्या मारा. बरं का पंत, माझ्या सिस्टरचं वेट चाळीस पौंड उतरलं दोरीवरच्या उड्यांनी." कु. कमलिनी केंकरे म्हणाली.

शेवटी सर्वांच्या मते मी सकाळी रनिंग करावे आणि संध्याकाळी दोरीवरच्या उड्या माराव्यात असे ठरले आणि मी सातव्या बशीमधले भजे उचलले.


कुटूंबाचा मात्र माझ्या 'डाएटच्या' बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता, कारण रोज काही काही चमत्कारिक पदार्थ माझ्या पानात पडायला लागले. एके दिवशी नुसती पडवळे उकडून तिने मला खायला घातली. शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवळीच्या शेंगा वगैरे सडपातळ भाज्यांचा खुराक तिने चालू केला. कोबी, कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाकघरातून हकालपट्टी झाली. सकाळचा चहा देखील सुरूवातीला होता तसा राहिला नाही. बिनसाखरेचा चहा इतका कडू लागत असेल अशी यापूर्वी कधीच कल्पना आली नाही मला.

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

B KUMAR'S ACADEMY

i) 

१

ii) 

१

**२. कोण कोणास म्हणाले ते लिहा.** १

i) ‘‘नॉन्सेन्स ! रनिंग कर रोज’’

**३. स्वमत** ३

i) भिकोबा मुसळेने पंतांचे कसे समर्थन केले?

**प्र.४था टिपा लिहा :** ६

**१. बार्क :-**

**२. डॉ. होमी भाभा :-**

**प्र. ५ वा व्याकरण** १

**१. अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा.**

i) **‘पंत’**, भलतेच काय हो रोडावलेत’

ii) तुरळक तारीख ऐकून **मी** चळण्यासारखा नव्हतो.

**२. समानार्थी शब्द लिहा.** १

i) तारीफ - ii) महिना

**३. वचन बदला.** १

i) चहा ii) गाय

**४. विरुद्धार्थी शब्द लिहा.** १

i) सकाळ x ii) सुदैव x

***

B.KUMAR'S ACADEMY

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 **+91 9619619937, 0250-2334511**

## Unit Test - 2

**विषय** : मराठी — **५.दोन दिवस,६.चुडीवाला,७.फुटप्रिन्टस,** — **एकूण गुण :** ४०

**इयत्ता** : १० वी — **८.ऊर्जाशक्तीचा जागर,९.जाता अस्ताला (स्थूलवाचन)** — **वेळ :** २ तास

**प्र.१ला पुढील पद्याच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.**

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
हे हात माझे सर्वस्व: दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.
दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कस, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.

**१) आकृत्या पूर्ण करा.**

i) भाकरीचा चंद्र शोधण्यात बरबाद झालेली - [ ] १

ii) कवी जगाच्या शाळेत या गोष्टी शिकले १

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** १

i) कवीने चंद्राला कोणाची उपमा दिली आहे?

**३. योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.** १

i) कवीने याचा विचार हरघडी केला ....................

अ) भाकरीचा ब) दु:खाचा क) जीवनाचा ड) दुनियेचा

**४. खालील काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.** ३

i) हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले,
कधी माना उंचावलले कलम झालेले पाहिले.

**प्र२ रा पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.**

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 +91 9619619937, 0250-2334511

"चुडीवाला आऽऽला, चुडीवाला आऽऽला".

आंब्याच्या झाडाखाली असलेल्या चौथऱ्यावर अब्दुल बसला आणि क्षणातच सारा कामधंदा सोडून स्त्रियांची गर्दी अब्दुलच्या आजूबाजूला जमली. "त्या लाल रंगाच्या मला.... त्या हिरव्या मला... चुडीवाला, माझ्यासाठी आरसा आणला? मागच्या वेळी मी सांगितलं होतं नं?"

अब्दुलच्या आजूबाजूला गर्दीच गर्दी झाली आणि गोंधळ सुरु झाला. प्रत्येकीला प्रथम बांगड्या भरायच्या होत्या.

अब्दुल एकेकीच्या हातांत बांगड्या भरू लागला. त्यांना हव्या तशा; त्यांच्या मनपसंत. त्यांना बांगड्या भरणं म्हणजे एक दिव्यच; पण अब्दुलला ती कला साधली होती. बांगड्या भरल्यानंतरचा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अब्दुलला लाखमोलाचा वाटे. दोन-तीन तास बांगड्या भरण्याचा कार्यक्रम सुरु होता. साऱ्या तपोवनातील तो एक आनंदाचा आणि चैतन्याचा दिवस ! आवाज, गडबड, गोंधळ, चेहऱ्यावरचा आनंद आणि हे सारे वातावरण निर्माण करणारा चुडीवाला अब्दुल म्हणजे तपोवनातील स्त्रियांना, मुलींना अगदी देवदूतासारखा वाटे. वर्षातून दोनदा, संक्रांतीला आणि ज्येष्ठ पौर्णिमेला तपोवनातील स्त्रिया चुडीवाल्याची आतुरतेने वाट पाहत आणि अब्दुललाही तो आनंद बघून विलक्षण समाधान लाभे.

असेच काही दिवस गेले. एक दिवस रघुभैया आला. त्याच्या हाती पोस्टमनने दिलेले पत्र होते.

"अब्दुलमियाँ, तपोवन से चिठ्ठी आयी है आपको."

"दिखाव...दिखाव."

"अरे, पण चिठ्ठी मराठीतून आहे."

"मग वाचून दाखव नं तूच."

रघुभैयाने चिठ्ठी मोठ्याने वाचली. चिठ्ठीतला मजकूर ऐकून अब्दुल आणि शन्नू यांना खूपच आनंद झाला. तपोवनात होणाऱ्या संमेलनाच्या प्रसंगी अब्दुलचा खास सत्कार होणार होता आणि त्यासाठी पत्र पाठवून दाजीसाहेबांना त्याला निमंत्रण दिले होते.

**१) आकृतिबंध पूर्ण करा.**

i) तपोवनातील स्त्रिया अब्दुलची आतुरतेने या दिवशी वाट पाहत ↓ [ ] [ ] १

B.KUMAR'S ACADEMY

ii) अब्दुल तपोवनात गेल्यावर निर्माण होणारे वातावरण [ ] [ ] [ ] [ ] १

**२. कोण ते लिहा.** १

i) अब्दुलला सत्काराचे निमंत्रण देणारे - [ ]

**३. सहसंबंध लिहा.** १

i) हातात : बांगड्या :: झाडाखाली : ................

**४) 'इच्छा तेथे मार्ग' - अब्दुलच्या उदाहरणावरून स्पष्ट करा.** ३

**प्र. ३रा पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.**

रेखामावशी फिरायच्या पायीच, कधी तरी सायकलनं ! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढंही त्यांनी झाडं लावली होती. त्यांतलं एक लिंबोणीचं होतं; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. ''आणि आता पाहा, या आहेत रेखा मावशींच्या फूटप्रिन्टस...! असं म्हणत त्यानं मोबाईलचं कसलंस बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा ! सगळे 'आ' वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली...एकदम चंदेरी वर्खात मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले...'सिल्व्हर फूटप्रिन्टस ! दि मोस्ट क्लिन फूटप्रिन्टस !!'

''वाऽ पाह्यलंत रेखामावशीचे पाय चंदेरी आहेत. एकदम स्वच्छ. झऱ्याच्या स्फटिक स्वच्छ पाण्यासारखे,''सुमित ओरडला. ''ह्याऽ हे भलंतच !'' रेखामावशींच्या पायाकडे पाहत पावडेकाका म्हणाले.

सुमितनं हलकेच पावडेकाकांच्या गोजिऱ्या तळव्यांकडे पाहिले आणि म्हणाला, ''काका, आपण तुमच्या पायाचं पाहूया का?''

''त्यात पाह्यचं काय? हे बघ, माझे पाय किती स्वच्छ आणि मऊसूत आहेत...!'' पावडेकाका पाय सगळ्यांना दाखवत म्हणाले. ''पण चला काय सांगतंय तुमचं ॲप, ते तरी पाहूया,'' त्यांनी पुस्ती जोडली.

सुमितनं पावडेकाकांचा डेटा ॲपमध्ये भरायला सुरु केला.

''काका, आता तुम्ही कुठून आलात?''

''विश्रांतवाडीहून.''

''कसे?''

''अर्थातच, कारने.''

''वीस किलोमीटर कारने. तुम्ही एकटेच...!' सुमितची शंका

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** २

i) रेखा मावशीच्या फूटप्रिन्टस
→ [ ] → [ ]

**२. चौकटी पूर्ण करा.** २

i) पावडेकाका या ठिकाणाहून आले - [ ]

ii) पावडेकाकांचे प्रवासाचे साधन - [ ]

**३. स्वमत :-** ३

i) रेखा मावशी पर्यावरणास कशी मदत करत होती ते तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.४ था पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(या युनियन हायस्कूलमध्ये शिक्षक, त्यांची सेवाभावी वृत्ती, विद्यार्थ्यांना शिकवताना त्यामध्ये त्यांचे स्वत:ला झोकून देणे आणि निरपेक्ष भावनेने केलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या केवळ शालेय अभ्यासाचाच पाया पक्का झाला असं नाही, तर आयुष्याचाच पाया पक्का झाला. शिक्षणाबद्दल एक आंतरिक ओढ वाटू लागली.

आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे. आमचं हायस्कूलही गरीब होत, त्यामुळं उत्तरपत्रिका घरून न्यावी लागायची. त्यावेळी तिची किंमत फक्त तीन पैसे असायची. आपल्याला कदाचित पटणार नाही; पण तेव्हा दर आठवड्याला हे तीन पैसे उभे करताना

B.KUMAR'S ACADEMY

देखील माझ्य आईच्या डोळ्यांत पाणी उभं राहायचं. आजही हे आठवलं, की माझ्या अंगावर काटा उभा राहतो. तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले. पडेल ते काम केलं. काँग्रेस हाऊसजवळ काही काम मिळणार आहे, असं समजल्यानं एकदा ती तिकडं गेली. रांगेत उभी राहिली, तशीच ताटकळत; पण त्यावेळी तिला सांगण्यात आलं, की फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाईल. हे ऐकून अर्थातच ती नाराज झाली, घराकडं मागं फिरली. त्याच वेळी तिनं ठरवलं, की 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही.

तिनं प्रत्यक्षात केलंही तसंच. माझ्यासाठी तिनं घेतलेले कष्ट मी कोणत्या शब्दांतून सांगू? कोरे, पाठकोरे, लिहून उरलेले कागद ती एकत्र जमवायची आणि त्याच्या वह्या करून द्यायची. अखंड पेन्सिल मला मिळणं अवघड होतं. त्यामुळं जेमतेम हातात धरता येईल अशा पेन्सिलनेच लिहावं लागे.

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** १

युनियन हायस्कूलमधील शिक्षकांची वैशिष्ट्ये

**२. एका वाक्यात उत्तर लिहा.** २

i) लेखकाची आई काँग्रेस हाऊसजवळ का गेली?

ii) लेखकाच्या हायस्कूलमध्ये नेहमी कोणत्या दिवशी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे?

**३. चौकटी पूर्ण करा.** १

लेखकाची आई वह्या करून देण्यासाठी एकत्र जमवायची ते कागद

**४. स्वमत** ३

i) लेखकाच्या शिक्षणासाठी लेखकाच्या आईने कोणकोणते कष्ट सोसले होते ते लिहा?

**प्र.५वा खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. (कोणतेही दोन)** ६

i) पणतीच्या उदाहरणावरुन कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

ii) तुम्हांला समजलेली कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

iii) कवितेतील सूर्य आणि पणती या प्रतिकांचा तुम्हांला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.

B.KUMAR'S ACADEMY

**प्र.६वा व्याकरण**

**१. खालील वाक्यातील अलंकार ओळखा. उपमेय व उपमान लिहा.** २

i) पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात.

**२. वाक्य शुद्ध करुन लिहा.** १

i) वेगवेगळि कष्टाचि कामं ति करत होती

**३. वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** २

i) चेहरा पडणे

**४. खालील विराम चिन्हाची नावे लिहा.** १

i) " "    ii) !

***

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 +91 9619619937, 0250-2334511

B.KUMAR'S ACADEMY

**Unit Test - 3**

| | | |
|---|---|---|
| **विषय** : मराठी | **९.औक्षण, १०.रंग साहित्याचे, ११.जंगल डायरी,** | **एकूण गुण :** ४० |
| **इयत्ता** : १०वी | **१२. रंग मजेचे रंग उद्याचे, जगणं कॅक्टसचं (स्थूलवाचन)** | **वेळ :** २ तास |

**प्र.१ ला : खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.**

| | |
|---|---|
| नाही मुठीमध्ये द्रव्य<br>नाही शिरेमध्ये रक्त,<br>काय करावें कळेना<br>नाही कष्टाचे सामर्थ्य ;<br>जीव ओवाळावा तरी<br>जीव किती हा लहान ;<br>तुझ्या शौर्यगाथेपुढे<br>त्याची केवढीशी शान ;<br>वर घोंघावे बंबारा,<br>पुढे कल्लोळ धुराचे, | धडाडत्या तोफांतून<br>तुझें पाऊल जिद्दीचें ;<br>तुझी विजयाची दौड<br>डोळे भरून पहावी ;<br>डोळ्यांतील आसवांची<br>ज्योत ज्योत पाजळावी<br>अशा असंख्य ज्योतींची<br>तुझ्यामागून राखण ;<br>दीनदुबळ्यांचे असें<br>तुला एकच औक्षण. |

**१. सहसंबंध लिहा.** १

i) घोंघावे : बंबारा :: धडाडत्या : ................

ii) मुठीमध्ये : द्रव्य :: शिरेमध्ये : ................

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** २

i) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते?

ii) डोळे भरुन पहावे असे दृश्य कोणते?

**३. खालील पंक्तीचे रसग्रहण करा.** ४


"वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचे ;

**प्र.२रा. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.**

कविता : छान निरिक्षण आहे हं तुझं. बरं मला एक सांग तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का?
सुश्रुत : हो, करतात ना.
कविता : कोणत्या तारखेला करतात?
सुश्रुत : अंऽऽऽ, २७ फेब्रुवारीला.
कविता : अगदी बरोबर. तो कोणाचा जन्मदिवस आहे, माहीत आहे तुला?
सुश्रुत : नाही ग.

कविता : ‘नटसम्राट’ नाटकाचे लेखक वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कवीवर्य कुसुमाग्रज यांचा. त्यांच्या ‘विशाखा’ या काव्यसंग्रहाला मानाचा ‘ज्ञानपीठ’ पुरस्कार मिळाला आहे.
सुश्रुत : खरंच?
कविता : कुसुमाग्रजांबरोबरच केशवसुत, बालकवी, बा.भ. बोरकर, बा. सी. मर्ढेकर, शांता शेळके, इंदिरा संत, सुरेश भट, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे अशा अनेक कवींनी मला आपल्या प्रतिभेने सजवले. संतकाव्यापासून पंतकाव्य, मध्ययुगीन काव्य, शाहिरी काव्य अशी वळणे घेत आधुनिक काळात मी मुक्त छंदाचे रूप धारण केले आहे.
नाटक : होय सुश्रुत, ओळखलंस का मला?
सुश्रुत : तू कोण आहेस रे?
नाटक : माझ्याकडे बघ म्हणजे तुला कळेल.
सुश्रुत : अरे, नाटकदादा तूऽऽ
नाटक : पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यामुळे मी मराठी माणसाच्या हृदयात अढळ स्थान प्राप्त करतो. तुला माहीत आहे, माझं रंगमंचावर सादरीकरण होणार आहे याचे भान ठेवूनच नाटककार माझी मांडणी करतो. वाचनीय अन् प्रेक्षणीय व्हावं अशी त्याची अपेक्षा असते.

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** १




**२. कारणे लिहा.** २

i) नाटक मराठी माणसाच्या हृदयात अढळ स्थान प्राप्त करते कारण .............

ii) २६ फेब्रुवारीला मराठी दिन साजरा करतात कारण ;..................

**३. स्वमत**

i) ‘नाटक कलाकाराला घडवते’ याचे समर्थन करणारे विचार तुमच्या शब्दात मांडा ३

**४. चूक की बरोबर ते लिहा.** १

i) ‘नटसम्राट’ नाटकाचे लेखक कुसुमाग्रज म्हणजेच वि. वा. शिरवाडकर होत.

**प्र. ३ रा खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

साधारणत: कुत्र्यापेक्षा लहान आकाराची ही पाच महिन्यांची पिल्लं होती. या वयात लहान मुलं जशी खेळकर असतात, तशीच ही खेळकर होती. एकमेकांचा पाठलाग करणं, मारामारी करणं, पाण्यात उड्या घेणं असे खेळ सुरू झाले. मध्येच आई वळून एखाद्या पिल्लाला मायेने चाटत होती. थोडा वेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली. डोकं वळवून तिनं हळूच ‘ऑऽ वऽ’ असा आवाज केला. हा पिल्लांना मागं येण्याबद्दलचा इशारा होता. लगेच वळून ती चालायला लागली. हिनं जंगलात कुठंतरी नक्कीच एखादं सांबर, रानगवा, नीलगाय, रानडुकराची शिकार साधली असावा; पण अशी शिकार जड असल्यानं ती उचलून पिल्लापर्यंत आणणं शक्य नसंत. त्यामुळं पिल्लांजवळ येऊन घटकाभर पाण्यात बसून तिनं विश्रांती घेतली होती आणि आता ती पिल्लांना त्या शिकारीकडं घेऊन जात होती. या चार पिल्लांसोबतच स्वत:चं पोट भरण्यासाठी तिला सतत कोणती-कोणती शिकार करणं आवश्यकच होतं. त्या कलेत ही चांगली पारंगत होती.

वाघिणीनं नाला पार करून बांबूच्या गंजीत पाय ठेवला. आत शिरण्याआधी तिनं वळून पिल्लं सोबत येताहेत की नाही हे पाहून घेतलं. दोन पिल्लं तिच्या मागोमाग निघाली होती; पण दोघांना

B.KUMAR'S ACADEMY

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 **+91 9619619937, 0250-2334511**

अद्याप भान नव्हतं. ती पाण्यातच एकमेकांशी खेळण्यात दंग झाली होती. वाघिणीनं परत त्यांना बोलावणारा आवाज काढला. आईच्या या आवाजाबरोबर दोन्ही पिल्लांनी आपल्या खेळ थांबवला आणि पळत सुटली. दोनच मिनिटांत पिल्लांना घेऊन वाघीण जंगलात दिसेनाशी झाली. आज मी वाघिणीतल्या आईची एक वेगळीच झलक बघितली होती. माझ्या व्याघ्रअनुभवात मोलाची भर घालणारा हा अनुभव होता.

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** १

i) वाघिणीला चांगलीच पारंगत असलेली कला → [ ]

ii) वाघिणीने ह्यांची शिकार साधली असावी २

[ ] [ ] [ ] [ ]

**२. स्वमत**

i) डायरी लिहीणे हा छंद प्रत्येकाने जोपासावा या विषयावर तुमचे मत स्पष्ट करा. ३

**३. परिच्छेदात आलेल्या वन्यप्राण्यांची नावे लिहा.** १

**प्र.४ था पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उद्याचे, जपून ठेवू सृष्टी...
धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे
उधळू, फेकू बिया डोंगरी, रूजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे
डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी ?
रंग मजेचे, रंग उद्याचे

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

i) यंत्रसंगतीने मिळेल १

[ ] [ ]

ii) काळ्या आईला असे जगवू १

( ) ( )

**iii) चौकटी पूर्ण करा.** २

B.KUMAR'S ACADEMY

१. जिथे दृष्टी पोहचते तेथे असतात -

२. संगणक हे देत नाही -

**२. काव्यसौंदर्य** ३

**i) पुढील ओळींचा अर्थ स्पष्ट करा.**

डोंगरातून वाहत येते,
खळाळते हे पाणी फेनधवलशा तुषारांमध्ये,
राहाल कैसे कष्टी?
रंग मजेचे, रंग उद्याचे.

**प्र.५वा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** ६

i) थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस ! या विधानाची यथार्थता लिहा.

ii) 'पाणी हेच जीवन !' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

iii) टिप लिहा. - सग्वारो कॅक्टस

**प्र ६ वा व्याकरण**

**१. लिंग ओळखा.** २

i) देव -

ii) शाळा -

iii) चेंडू -

iv) झाड -

**२. खालील अधोरेखित शब्दांचे अव्यय ओळखून प्रकार लिहा.** २

i) माझी छाती आनंदाने फुगत असे आणि मी अधिक जोराने चेंडू फेकत असे.

ii) मी प्रथम ग्राऊंडवर हजर होत असे.

**३. अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.** २

i) आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन !

* * *

B.KUMAR'S ACADEMY

# B.KUMAR'S ACADEMY

## Unit Test - 4


**विषय** : मराठी **१३. हिरवगार झाडासारखं, १४. बीज पेरले गेले,** **एकूण गुण** : ३०

**इयत्ता** : १०वी **१५. खरा नागरीक, १६.स्वप्न करू साकार, व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन)** **वेळ** : १ तास

**प्र.१ ला : पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सुचनांनुसार कृति करा.**

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करुन तपश्चर्या करत ...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात.
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरुन वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर ? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** २




A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 **+91 9619619937, 0250-2334511**

२. उत्तरे लिहा. २

i) मुकाट सहन करते - [ ]

ii) वहीच्या पानावर अलगद उतरतात - [ ]

iii) सरसावलेले असतात - [ ]

iv) झाड कोणासारखे बसते - [ ]

३. पुढील ओळींचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा. ३

i) 'झाडाचे बाहू सरसावलेले असतात, मुसाफिरांना कवेत घेण्यासाठी'.

प्र. २ रा.पुढील उतारा वाचून दिलेल्या सुचनांनुसार कृती करा.

त्यानंतर माझ्या आयुष्याला एक निराळेच वळण लागले. माझे चुलते पुण्याच्या वाय.एम.सी.ए. च्या कंपाऊंडमध्ये राहत असत. ही संस्था खेळाकरिता प्रसिद्ध असल्याकारणाने बरेच लोक या संस्थेचे सभासद होते. रोज सकाळ-संध्याकाळ ज्यांना जसे जमेल त्याप्रमाणे ते खेळायला येत असत. साहजिकच याचा परिणाम माझ्या बालमनावर होई. मुळातच खेळाची आवड जास्त असल्याने मी त्या सभासदांचा खेळ लक्ष देऊन पाहू लागलो. अनेक खेळाडू पाहण्याची मला रोज संधी मिळू लागली. शाळा सुटली ना सुटली तोच धावत येऊन मी प्रथम ग्राऊंडवर हजर होत असे. सर्व खेळात मला क्रिकेटचा खेळ फार आवडू लागला. या खेळानेच मला जास्त भुरळ पाडली. कधी कधी, काही खेळाडू स्वत:ला भरपूर खेळायला मिळावे म्हणून लवकर येत असत. कोणी नाही असे पाहून ते मला चेंडू फेकायला बोलवत. मी अशा कामासाठी नेहमीच तयार असायचा. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन! या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन मी अधिक उत्साहाने आणि आनंदाने जितक्या जोरात बॉल टाकता येईल, तितक्या जोरात तो टाकून सभासदांची दांडी उडवण्याचा प्रयत्न करत असे. माझा उत्साह पाहून मला उत्तेजन मिळावे आणि त्यांनाही खेळायला मिळावे, म्हणून ते देखील मुद्दाम आऊट होत, तेव्हा माझी छाती आनंदाने फुगत असे आणि मी अधिक जोराने चेंडू फेकत असे. मात्र जेव्हा इतर सभासद येत तेव्हा नाइलाजाने त्यांना बॉल द्यावा लागे. तरी सुद्धा लांब उडालेला चेंडू धावत जाऊन अडवण्यात आणि तो लगेच उचलून फेकण्यात मी समाधान मानत असे. आपणही यांच्याप्रमाणेच खेळावे, अशी इच्छा मनात येईल. पुढच्या आयुष्यात क्रिकेट खेळाडू होण्याची खूणगाठ मी इथेच मनाशी बांधली. प्रॅक्टिस संपल्यावर चेंडू गोळा करू लागणे, दुसऱ्या दिवसासाठी ग्राऊंडवर पाणी मारणे इत्यादी कामांत मी ग्राऊंडसमनला आनंदाने मदत करत असे. हे सर्व होत असताना, रात्रीचे ६ ते ८ वाजता माझे काका सर्व मुलांना एकत्र बसवून प्रार्थना शिकवत व अभ्यासाला बसवत.

B.KUMAR'S ACADEMY

१. चौकटी पूर्ण करा. २

i) लेखकाने ही खूणगाठ मनाशी बांधली → [ ]

ii) उताऱ्यात आलेली म्हण - [ ]

२. उत्तरे लिहा. २

i) खेळासाठी प्रसिद्ध संस्था - [ ]

ii) लेखकाचा आवडता खेळ - [ ]


३. 'आंधळा मागतो एक डोळा व देव देतो दोन!असे लेखकाला का वाटले याबाबत तुमचे मत लिहा. ३

प्र. ३ पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

मावशीचं घर गावाबाहेर डोंगरपायथ्याशी. मध्ये एक नदीही लागायची. पूर्वी ही नदी पाण्यात उतरुनच चालत चालत पार करायला लागायची; परंतु आता कोकण रेल्वे आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला. पुलाच्या एका बाजून लोकांसाठी पायवाटही ठेवली होती. या पुलामुळं आता जाणं-येणं सोपं झालं होतं. निरंजन अभ्यासाची मनातल्या मनात उजळणी करत झपाझप चालला होता. वाटेत त्याला भला मोठा दगड पडलेला दिसला. कुणीतरी कामासाठी घेतला असेल आणि पुन्हा तसाच ठेवून दिला असेल. निरंजनने तो दगड उचलून बाजूला ठेवला. त्याला लोकांच्या या बेफिकीर प्रवृत्तीचा भयंकर राग येई. तुम्ही विसरलात; पण दुसरा ठेचकाळून जीवाला मुकतो त्याचं काय! असंच त्याचं म्हणणं. निरंजन पुलावर पोहोचला तेव्हा साडेनऊ वाजून गेले असावेत. आता नऊ पन्नासची गाडी येईल. धाड्धाड् आवाज करत दिमाखात पुलावरुन जाईल. ही कोकण गाडी किती छान दिसते; पण दिसते न दिसते तोच लगेच बोगदयात शिरते. काय मजा येत असेल नाही गाडीतून जायला? आपणही मोठं झाल्यावर गाडीतून फिरु, या विचाराने तो हुरळून गेला. तोच त्याचं लक्ष डाव्या बाजूस रुळाखाली पडलेल्या भल्या मोठया भगदाडाकडे गेलं. हे छिद्र कसलं? रोज नसतं बुवा, असं म्हणत त्यानं जवळ जाऊन पाहिलं तो कुणीतरी कॉंक्रीट फोडून रेल्वेचे रुळ वेडेवाकडे करुन ठेवल्याचं त्याच्या ध्यानी आलं. निरंजनला आश्चर्यच वाटलं.

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल.

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** १




**२. रिकाम्या जागा भरा.** १

i) आता ------------ आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला.

ii) या ------------ जाणं-येणं सोपं झालं होतं.

**३. सकारण लिहा.** १

i) पूर्वीसारखे या नदीच्या पाण्यात उतरुन चालत चालत नदी पार करावी लागत नाही कारण ; --------

**४. परिणाम लिहा.** १

i) जर दगड बाजूला ठेवायचे विसरलात -------------.

**५. स्वमत.** ३

i) तुमच्या खबरदारीने भावी धोका टळला असा प्रसंग तुमच्या शब्दात मांडा.

**प्र.४. खालील कवितेच्या आधारे आकृतिबंध पूर्ण करा.**

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ॥
फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ॥
या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार ॥

**१. ओघतक्ता पूर्ण करा.** १

--------
↓
विश्वाची संपदा
↓
--------
↓
देशाचे भविष्य

**२. चौकटी पूर्ण करा.** २

i) नव्या पिढीचे, युगाचे करु साकार - [ ]

ii) यावर आमुचा अधिकार आहे - [ ]

**३. चौकटी पूर्ण करा.** १

i) फुलामुलांतून हसणारा - [ ]

ii) मातीचे मंगल - [ ]

**४. खालील काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.** ३

i) या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार नव्या पिढीचे,
नव्या युगाचे स्वप्न करु साकार.

**प्र.५. टिपा लिहा.** ६

i) "काळाप्रमाणे शब्दाच्या स्वरुपात, त्यांच्या अर्थात, त्यांच्या परस्पर संबंधात बदल होतात" हे सोदाहरण स्पष्ट करा.

ii) व्युत्पत्ती कोशाचे कार्य स्पष्ट करा.

**प्र.६. व्याकरण**

**१. वाक्यातील काळ ओळखा.** १

i) स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती.

**२. तक्ता पूर्ण करा.** २

| | शब्द | मूळ शब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| १) | गावाबाहेर | | |
| २) | लोकांच्या | | |
| ३) | रूळाखाली | | |
| ४) | भगदाडाकडे | | |

B.KUMAR'S ACADEMY

**३. अधोरेखित शब्दाचे अव्यय ओळखा.** २

i) मावशीच घर गावा<u>**बाहेर**</u> डोंगरा-पाशी आहे.

ii) मी सर्वप्रथम झाडा<u>**वर**</u> चढलो.

**४. पर्यायी शब्द लिहा.** १

i) काम ii) कौशल्य

* * *

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 **+91 9619619937, 0250-2334511**